आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर
वाचा एका क्लिकवर
www.elaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ९ वे ● अंक २५ वा ● शनिवार दि. १२ जुलै २०२५ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●




## छत्रपती शिवाजी महाराजांचा तेजस्वी इतिहास जागतिक पातळीवर पोहोचणार - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून आनंद व्यक्त

मुंबई : युनेस्कोच्या जागतिक वारसा



यादीत शिवरायांच्या १२ किल्ल्यांचा समावेश झाल्याची घोषणा आज झाली असून, ही बातमी संपूर्ण महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानास्पद आणि ऐतिहासिक ठरली आहे. या निर्णयामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा तेजस्वी इतिहास जागतिक पातळीवर पोहोचणार असून, हे राज्यासाठी मोठं यश आहे, अशी भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली.

साल्हेर, शिवनेरी, लोहगड, खांदेरी, रायगड, राजगड, प्रतापगड, सुवर्णदुर्ग, पन्हाळा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग या ११ आणि तामिळनाडूच्या जिंजी किल्ल्यांचा प्रस्ताव युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीमध्ये नामांकनासाठी गेल्या वर्षी पाठविण्यात आला होता.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणतात की, आपल्या स्वराज्याचे साक्षीदार असलेले हे किल्ले म्हणजे महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाची जिवंत प्रतीकं आहेत. त्यांचा जागतिक वारसा यादीत समावेश होणं, हे महाराष्ट्रासाठी गौरवाची बाब आहे.

या ऐतिहासिक निर्णयासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार आणि भारतीय पुरातत्त्व विभागाचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मन:पूर्वक आभार मानले आहेत. मुख्यमंत्री असताना आपण स्वतः या किल्ल्यांच्या नामांकनासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याचंही त्यांनी नमूद केलं.

राज्य शासन हे या सर्व गड–किल्ल्यांच्या जतन, संवर्धन आणि पुढील पिढ्यांसाठी प्रेरणास्थान म्हणून टिकवून ठेवण्यासाठी कटिबद्ध असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. या ऐतिहासिक घडामोडीबद्दल त्यांनी सर्व शिवप्रेमी आणि महाराष्ट्रवासीयांचे मन:पूर्वक अभिनंदन केलं आहे.

## महाराष्ट्र गट-क सेवा (मुख्य) परीक्षा-२०२३ : लिपिक-टकलेखक संवर्गाचा अंतिम निकाल जाहीर

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि.



१७ डिसेंबर, २०२३ रोजी मुंबईसह छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर, नाशिक व पुणे जिल्हाकेंद्रांवर घेण्यात आलेल्या महाराष्ट्र गट–क सेवा मुख्य परीक्षा–२०२३ मधील लिपिक–टंकलेखक या संवर्गातील एकूण २७८ नियुक्ती प्राधिकारी कार्यालयांचा अंतिम निकाल जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार एकूण ६५१९ उमेदवार विषयांकित पदाकरिता शिफारसपात्र ठरले आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील श्री. कट्ठे तन्मय तानाजी (बैठक क्रमांक –ण०५३१६५) हे राज्यातून प्रथम आले आहेत. मागासवर्गवारीमधून पुणे जिल्ह्यातील श्री. किसवे किशोर चंद्रकांत (बैठक क्रमांक– झछ००६८३४५) हे राज्यात प्रथम आले आहेत तर महिला वर्गवारीमधून सांगली जिल्ह्यातील श्रीमती गावडे दुर्गा विजयराव (बैठक क्रमांक –झछ००७११८२) या राज्यात प्रथम आल्या आहेत.

अंतिम निकालातील ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. या संवर्गाकरिता प्रतीक्षायादी कार्यान्वित राहणार नाही. अधिक माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे आयोगाने कळविले आहे.

# अंमली पदार्थांच्या विळख्यातून लातूरच्या तरुणाईला मुक्त करावे ही माझं लातूर परिवाराची अपेक्षा

लातूर : शांत, सुसंकृत, सुरक्षित आणि शैक्षणिक शहर म्हणून राज्यात नावलौकिक असलेलं माझं लातूर. मात्र गेल्या काही दिवसांत घडलेल्या घटना शहराच्या तसेच जिल्ह्याच्या लौकिकाला साजेशा नाहीत.






वाढती गुन्हेगारी, अवैध धंदे, अंमली पदार्थांची सहज उपलब्धता यामुळे लातूरकरांच्या चिंतेत वाढ होणे साहजिक आहे. गेल्या दोन महिन्यात दुसऱ्यांदा मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांचा साठा पोलिसांकडून जप्त झाला आहे. पोलिसांच्या कारवाईचे निश्र्चितच स्वागत आहे. पण गुन्हेगारांमध्ये एवढी हिम्मत येतेच कुठून याचा शोध घेणे आवश्यक आहे. नुसत्या कारवाईवर न थांबता या अवैध आणि तरुणाईला अंधकारात नेणाऱ्या तसेच सामाजिक आरोग्य धोक्यात आणणाऱ्या या व्यवसायाची पाळे मुळे शोधून ती नष्ट करण्यासाठीचे प्रयत्न होणे गरजेचे आहे. शहरातील कॅफे सेंटर, चहापाणी या गोंडस नावाखाली चालणारे धूम्रपान गृह, या अवैध व्यवसायाचे वाहक होत आहेत. अशा ठिकाणी विद्यालयातील अल्पवयीन, महाविद्यालयीन तरुण–तरुणींचा मुक्त वावर पालकांची चिंता वाढविणारा आहे.

लातूर जिल्ह्याला कार्यतत्पर, कठोर, संवेदनशील, दक्ष पोलीस अधिकाऱ्यांची परंपरा लाभली आहे. लातूर शहराने नेहमीच अशा अधिकाऱ्यांना पाठबळ दिलेले आहे. पोलिसांनी खरेच पोलीस होऊन गुन्हेगारांवर वचक बसवावा आणि वाढती गुन्हेगारी, अंमली पदार्थ, अवैध धंदे या माध्यमातून लातूरचे सामाजिक आरोग्य धोक्यात आणणाऱ्या गुन्हेगारांवर तात्काळ आळा बसेल यासाठी मोठ्या प्रमाणावर कारवाई करावी अशी विनंती माझं लातूर परिवार करीत आहे.

# देशातील सर्वोत्तम 'ऑफ शोअर एअरपोर्ट' मुंबईत उभारणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, : भारताला 'मेरीटाईम पॉवर' बनविणारे वाढवण बंदर जसे देशातील सर्वोत्तम 'ऑफ शोअर पोर्ट' होणार आहे त्याचप्रमाणे सर्वोत्तम 'ऑफ शोअर एअरपोर्ट' मुंबईत उभारणार असून जे मुंबईतील तिसरे एअरपोर्ट असेल. याचे काम लवकरच सुरु होईल. राज्यात सध्या २४ जिल्ह्यांमध्ये विमानतळ आणि धावपट्टीची सुविधा आहे आगामी कालावधीत ३० जिल्ह्यामध्ये या सुविधा वाढवत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.




हॉटेल ताज लँडस एंड वांद्रे येथे केंद्रीय नागरी हवाई मंत्रालय मार्फत आयोजित 'वेस्टर्न रीजन मिनिस्टर कॉन्फरन्स'चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी केंद्रीय नागरी हवाई मंत्री के. राममोहन नायडू, केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, गोव्याचे पर्यटन मंत्री रोहन कुंटे, गुजरातचे नागरी हवाई मंत्री बलवंत सिंग राजपूत, मध्य प्रदेशचे परिवहन मंत्री उदय प्रताप सिंग, केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाचे सचिव समिर कुमार सिन्हा उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारत ही जगात सर्वात वेगाने विकसित होत असलेली अर्थव्यवस्था आहे. जगातील चौथी मोठी अर्थव्यवस्था म्हणून उदयास येत आहे.भारताला विकासाकडे नेणाऱ्या रोबोस्ट एव्हिएशन इकोसिस्टीमची अत्यंत आवश्यकता आहे. काही वर्षापर्यंत विमानसेवा हा फक्त केंद्रांचाच विषय आहे अशी स्थिती होती पण आता परिस्थिती बदलली आहे. जे राज्य विमान वाहतूक हा विषय प्राधान्याने बघणार नाही ती प्रगतीत मागे पडतील अशी स्थिती असल्याने हा विषय महत्वाचा ठरत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात ग्रीन फील्ड आणि ग्राउंड फिल्ड विमान वाहतुकीला पूरक अशा सर्व सुविधा तयार करत आहोत. यासाठी मनुष्यबळाची अत्यंत आवश्यकता आहे. लवकरच भारत जगातील तिसरी अर्थव्यवस्था बनेल. या प्रगतीच्या वाटेमध्ये विमान वाहतुकीचा मोठा वाटा असेल. राज्यात सध्या २४ जिल्ह्यांमध्ये एअरपोर्ट आणि धावपट्टीची सुविधा आहे. या सुविधा आगामी कालावधीत ३० जिल्ह्यांमध्ये वाढवण्यात येणार आहेत. धावपट्ट्या अजून अपग्रेड करण्यात येत आहेत. विमातळ व रात्री विमान उतरवण्याची सुविधा उद्योजकांना व गुंतवणूकदारांना मोठ्या प्रमाणात आकर्षित करत असते. गडचिरोलीसारख्या दुर्गम जिल्ह्यामध्ये नवीन एअरपोर्ट बनवणार आहोत त्याचा प्रस्ताव केंद्र शासनाला सादर केला आहे. गडचिरोलीमध्ये दीड लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे यामध्ये वाढ होऊन ती दहा लाख कोटी पर्यंत वाढेल असा विश्र्वास आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, नवी मुंबई एअरपोर्टचे काम ९० च्या दशकामध्ये सुरू झाले. या कामाला विविध परवानगींची आवश्यकता होती. या विविध परवानगी घेण्यासाठी पंधरा वर्षे लागली, त्या सात परवानग्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी एकाचवेळी दिल्या. नवी मुंबई एअरपोर्ट लवकर सुरू करत आहोत. हे एअरपोर्ट आणि अटल सेतूमुळे प्रगतीला खूप मोठ्या प्रमाणात हातभार लागणार आहे. मुंबईपेक्षा तिपटीने मोठी असलेली मुंबई या परिसरात वसणार आहे. २०३० पर्यंत महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर इकॉनॉमी राज्य बनवणार आहे. एमएमआर प्रदेश व वाढवण बंदर परिसर येथेच १.५ ट्रिलियन अर्थव्यवस्था उभी राहण्याची क्षमता निर्माण होईल. महाराष्ट्रात विमानक्षेत्रातील उद्योजकांचे स्वागत आहे. दहिसर येथील रडारचे स्थलांतर करावे, जेणेकरून येथील परिसरातील अनेक वर्षे प्रलंबित प्रश्र्न मार्गी लागतील. त्याचप्रमाणे डीएननगर येथील ट्रान्समिशन टॉवर स्थलांतरीत करावेत अशी मागणी मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केली.

केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्रालय लवकरच उडान यात्री कॅफे सुरू करणार – केंद्रीय नागरी हवाई मंत्री के.राममोहन नायडू

केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू म्हणाले की, विमान वाहतूक क्षेत्रात केंद्र व राज्य यांच्या समन्वयासाठी नोडल अधिकारी नेमणार असून केंद्र शासन लवकरच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकार झालेले 'उडान यात्री कॅफे' सुरू करणार आहे. सर्वसामान्य माणसाचे जीवन सुसह्य करणारे निर्णय केंद्रीय विमान वाहतूक मंत्रालय घेत आहे असे केंद्रीय नागरी हवाई मंत्री के.राममोहन **(पान ४ वर)...**

## महाराष्ट्रातील वाढत्या अपघातांच्या घटनांकडे माजी मंत्री आ. अमित देशमुख यांनी सरकारचे लक्ष वेधले

मुंबई (प्रतिनधी) : राष्ट्रीय महामार्गावर शहरानजीक वाहनांची



वेग मर्यादा नियंत्रणात राहावी म्हणून उपाययोजना आहेत मात्र ग्रामीण भागात याबाबतीत दुर्लक्ष असल्याने मोठ्या प्रमाणात अपघात होऊन जीवित हानी होत आहे, हे रोखण्यासाठी तसेच दुर्दैवाने अपघात झालाच तर जखमींना वेळेत उपचार मिळण्याच्या दृष्टीने रोड सेफ्टी असिस्टंन्स प्रणाली अधिक मजबूत करावी अशी मागणी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवारी विधानसभेत बोलताना केली.

महाराष्ट्र विधिमंडळाच्या सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनादरम्यान राज्यातील वाढते अपघात आणि त्यामुळे मोठ्या प्रमाणात होणारी जीवितहानी या संदर्भाने सरकारचे लक्ष वेधताना आमदार अमित विलासराव देशमुख यांनी एका अपघाताच्या संदर्भाने स्वतःचा अनुभव सांगितला. ते म्हणाले की, मागच्या आठवड्यात धाराशिव जिल्ह्यातील लोहारा तालुक्यातील सास्तुर येथे जात असताना औसा तालुक्यात दोन दुचाकीचा अपघात झाला, ज्यात दोघे गंभीर जखमी झाले होते. त्यांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी मी स्वतः १०८ क्रमांकावर फोन केला, परंतु प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंर औसा शासकीय रुग्णालयात संपर्क साधला पण तेथेही डॉक्टर, कंपाउंडर कोणीही उपलब्ध नव्हते. शेवटी त्या दोघा जखमींना माझ्या वाहनातून लातूरला उपचारासाठी पाठवले. दुर्दैवाने त्यातील एकाचा मृत्यू झाला परंतु एकाचा जीव वाचला.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केंद्र सरकारच्या माध्यमातून राज्यात राष्ट्रीय महामार्गाचे जाळे उभारले आहे, दुर्दैवाने राज्यातील रस्त्यावर रस्ता सुरक्षा प्रणाली कार्यान्वीत असल्याचे दिसून येत नाही, सर्वच रस्त्यांच्या बाजूला धाबे आणि हॉटेलची गर्दी आहे. अपघात प्रवण ठिकाणी कोणत्याच सुरक्षेच्या व्यवस्था नाहीत. त्यामुळे अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, यातून मोठी जीवितहानी होत आहे, शिवाय जखमींची संख्याही वाढते आहे. असे नमूद करून या संदर्भाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी आमदार देशमुख यांनी यावेळी केली.

या लक्षवेधी सूचनेवर सरकारच्या वतीने बोलताना सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले म्हणाले की, बांधकाम विभागाकडून धाबे हॉटेल बांधण्यास लागणाऱ्या परवानगी सार्वजनिक बांधकाम विभाग देत नाही. केवळ हे धाबे व हॉटेल रस्त्यांपासून किती अंतरावर असावेत हे ठरवण्याचे अधिकार आमच्या विभागाकडे आहेत. गावाशेजारी राष्ट्रीय महामार्ग बंद करता येत नाही त्यामुळे कधी कधी दुचाकी, बैलगाडी, जनावरे रस्त्यावर येण्याने अपघाताच्या घटना घडतात, हे अपघात कमी करण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत, शिवाय अपघात प्रवण क्षेत्रात आवश्यक त्या सूचनाफलकांची उभारणी करण्यात येत आहे. अपघातग्रस्तांना लवकर उपचार मिळावेत म्हणूनही अनेक ठिकाणी सुविधा निर्माण केलेल्या आहेत, म्बुलन्स सर्व टोल नाक्याच्या ठिकाणी उपलब्ध असतात असेही त्यांनी यावेळी सांगितले. तालिका अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी या चर्चेत हस्तक्षेप करून राष्ट्रीय महामार्गावरील अपघाताचे ब्लॅक स्पॉट किती दिवसात कमी करणार, असा प्रश्र्न मंत्रीमहोदयांना विचारल्यानंतर त्यावर त्यानी सहा महिन्यात हे स्पॉट कमी करण्याचे प्रयत्न केले जातील असे उत्तर दिले.

**ख्रिस्ती समाजाच्या आंदोलनाकडे सरकारचे लक्ष वेधले**

सकल ख्रिस्ती समाजाकडून मुंबई येथील आझाद मैनावर आयोजित केलेल्या आंदोलनाकडे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज विधानसभेत पॉईंट ऑफ ऑर्डरच्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधले,ख्रिस्ती समाजातील भीतीचे वातावरण कमी करण्यासाठी शासनाने त्वरीत प्रयत्न करावेत, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली.

# युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत महाराष्ट्रातील अकरा आणि जिंजी किल्ल्याच्या समावेशाबद्दल आनंद व अभिमान - उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई, :– महाराष्ट्राचं आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्य स्थापनेच्या संग्रामाचे साक्षीदार आणि मराठ्यांच्या धैर्य, शौर्य, त्याग, पराक्रमाचा वारसा लाभलेले राज्यातील रायगड, राजगड, प्रतापगड, लोहगड, शिवनेरी, पन्हाळा, साल्हेर, खांदेरी, सुवर्णदुर्ग, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग तसेच तामिळनाडूतील जिंजी या बारा किल्ल्यांचा समावेश युनेस्को जागतिक वारसा नामांकन यादीत झाल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आनंद व्यक्त केला आहे. राज्याला हे यश मिळवून देण्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भूमिका, त्यांचे सहकार्य महत्त्वाचे ठरल्याचे सांगून त्यांचे विशेष आभार मानले आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभिमान, स्वाभिमान बाळगणाऱ्या तमाम महाराष्ट्रवासियांचे अभिनंदन करुन या ऐतिहासिक क्षणांबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील अठरापगड जाती, बारा बलुतेदार मावळ्यांना संघटीत करुन महाराष्ट्राच्या मातीत रयतेचं राज्य, शेतकऱ्यांचं स्वराज्य निर्माण केलं. रयतेचं राज्य स्थापन करण्याचा ध्यास घेऊन लढलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांना याच किल्यांनी भक्कम साथ दिली होती.



महाराजांच्या, त्यांच्या मावळ्यांच्या पराक्रमाचा इतिहास पाहिलेल्या या ऐतिहासिक किल्ल्यांचा समावेश युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत झाल्याने छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य, त्यांचे विचार, मराठी मावळ्यांचा पराक्रम जगभरात पोहोचेल. छत्रपती शिवाजी महाराज जगाला समजतील. ऐतिहासिक वारशाचा गौरव लाभलेल्या या बारा किल्ल्यांसह राज्यातील सर्वच किल्यांचं संरक्षण, संवर्धन करण्यासह त्यांचं महत्व, तिथे घडलेला इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी आपण सर्वांनी पुन्हा एकदा दृढसंकल्प होऊया, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे. युनेस्कोच्या यादीत महाराष्ट्रातील किल्ल्यांचा समावेश व्हावा यासाठी प्रयत्न केलेल्या राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागाचे त्यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या अभिनंदनपर संदेशात म्हणतात की, शिवरायांचे गडकिल्ले म्हणजे केवळ दगडधोंड्यांचे बांधकाम नाही, तर ते महाराष्ट्राच्या अस्मितेचे भक्कम बुरुज आहेत. आज त्यांना जागतिक दर्जा मिळाल्याने स्वराज्याच्या इतिहासाला नवसंजीवनी मिळाली आहे. राज्यातील दुर्ग दुर्गेश्र्वर रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग आणि खांदेरी हे ११ किल्ले शिवकालीन सामरिक रणनीती, अद्वितीय स्थापत्यकौशल्य आणि सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक आहेत. या यशासाठी महाराष्ट्र शासनाने अतिशय अभ्यासपूर्ण आणि शास्त्रीय पद्धतीने प्रस्ताव तयार केला होता. प्रधानमंत्री कार्यालयाने मराठा लष्करी स्थापत्य प्रस्तावाची निवड करून युनेस्कोकडे पाठवली. या यशात राज्य सरकारच्या प्रयत्नांबरोबरच केंद्र सरकारच्या नेतृत्वात झालेल्या शिष्टमंडळाच्या प्रयत्नांना मोलाचे यश मिळाले आहे.

युनेस्कोकडून मिळालेली ही मान्यता म्हणजे केवळ महाराष्ट्राच्या ऐतिहासिक वैभवाला अधोरेखित करणारा सन्मान नाही, तर ती पर्यटन, स्थानिक रोजगार, संशोधन आणि नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणारी आहे. महाराष्ट्रातील गडकोटांभोवती स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देणारी नवीन अर्थव्यवस्था निर्माण होण्याची दिशा या निर्णयामुळे निश्र्चित झाली आहे.

शिवकालीन गडकोटांना युनेस्कोकडून मिळालेली मान्यता ही आपल्या संस्कृतीचा, स्वराज्य संकल्पनेचा आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचा जागतिक स्वीकार आहे. हे महाराष्ट्रासाठी एक तेजस्वी पर्व आहे. महाराष्ट्राच्या मातीतून घडलेली ही दुर्गशक्ती आता जागतिक मंचावर मानाने झळकणार असल्याची आनंदाची भावना व्यक्त करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी छत्रपती शिवरायांना मानाचा मुजरा आणि महाराष्ट्राच्या जनतेचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.elaturprabhat.in

# मोदीजी निडर कसे ?

## संपादकीय...

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी एवढे निडर कसे काय असे अनेकजन म्हणत असताना ऐकिवात येत असते. विरोधी पक्षाचे खासदार नेहमीच संसदेत भारतीय राजकीय घडामोडीवर अर्थात बालकोट हल्ले, सर्जिकल ट्राईक, परवाचा पहलगाम हल्ला किंवा परदेशवारी करुन झाल्यानंतरचा अहवाल द्यावा, संसदेत सांगावा अशी मागणी करीत असतात पण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे एवढे निडर लिडर आहेत की, त्याना कशाचीही गय किंवा पर्वा नसतेच. देशात काय घडते किंवा भारतदेश कोणत्या दिशेने वाटचाल करतो आहे यांची चिंता ते करीत असताना दिसत नाहीत. आजवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानी तेरा वर्षात २७ देशाला भेटी देवून कोट्यावधी रुपयाचा चूराडा केला असेल पण भारतीय अर्थव्यवस्था कोणत्या अवस्थेत आहे हे पाहायलाही त्याना वेळ नसतो म्हणूनच ते नव्हे भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी एवढे निडर लिडर कसे काय असे कोणी म्हणत असेल तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे कांहीच कारण नसावे कारण ते खरोखरच निडर, बेडर, बिनधास्त लिडर आहेत हे त्यांचेच पोपटबाज सहकारी म्हणत असतात हे सांगण्याची गरजच काय असे म्हटल्यास वावगे ठरु नये.

करण असे की, पाकीस्तान, चिन आणी आता बांग्लादेशही पाकीस्तानशी सहकार्य करीत आहे, पहलगाम हल्ल्यातच ते दिसून आलेले आहे हे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याना सहजपणे वाटत असेल पण लष्करातील वरिष्ठ अधिकारी लेफ्टनंट जनरल राहूल सिंह यानी ऑपरेशन सिंदूर प्रकरणी चिनने पाकीस्तानला मदत केली म्हणतात. त्या बरोबर तूर्कियंशीही होता, नौदलातील कॅप्टन शिवकूमार म्हणतात ऑपरेशन सिंदूर मध्ये भारताने कांही विमाने गमावली, तर तिन्ही दलाचे लष्कर प्रमूख जनरल अनिल चौव्हाण म्हणाले की, भारताने कांही नुकसान सहन केल्यानंतर पाकीस्तानला धडा शिकविला. तर परवाच कनिष्ट लेफ्टंनट सिंग यांचे विधान खोडून भारतीय शासकास अर्थात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यानाच चीन, पाकिस्तान, बांगलादेश यांच्या युतीकडे लक्ष्य देण्याचा सल्ला देतात, तर अधूनमधून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, सरन्यायाधिश भुषण गवई हे ही भारतीय अर्थव्यवस्थेच्या विषमतेवर भाष्य केल्याने सरकार काय करते आहे हा प्रश्न अनुत्तरीत राहात असला तरी ही मूळात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हेच मनावर घेत नाहीत म्हणूनच मोदीजी निडर, बेडर लिडर आहेत अशी जी कुजबूज होत असते ती वास्तव असावी असेच म्हणावे लागेल यात संदेह नसावा.

विरोधी पक्षाच्या खासदारानी कितीही ओरड केली तरी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे बालाकोट हल्ला, सर्जिकल स्ट्राईक, पहलगाम हल्ला, किंवा दोन वर्षापासून जळत,धूपत असलेल्या मनिपूर बद्दल संसदेत बोलत नाहीत, बोलणार नाहीत त्यात पत्रकाराना तर कधीच निवेदन करणार नाहीत कारण ते निर्विवाद बहूमतवाले पंत...प्रधान आहेत. म्हणूनच ते कामाव्यतिरिक्त टाळेबाज विधानाखेरीज इतर कांहीही बोलत नाहीत, त्यासाठी त्याना वेळ कोठे असतात. विरोधकाशी बोलावे,पत्रकार परिषद घेवून पत्रकाराशी वार्तालाप करावा तर अनेक प्रश्नाना सामोरे जावे लागते. विरोधकाच्या प्रश्नाना उत्तर द्यावे लागते, चर्चा-संवादातून मार्ग स्विकारावा लागतो. मग प्रधानमंत्री म्हणून काय करावे दुसऱ्या-तिसऱ्याचे ऐकून देशाचे हित होते काय ? फक्त वटहूकुमी कारभारच चांगला न्यायीक असतो म्हणूनच ते निडर, बेडर, लिडर असावेत दुसरे काय ?

## घटस्फोटाचे वाढते प्रमाण चिंताजनक

लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात असे म्हटले जाते. पूर्वी या गाठी घट्ट बांधल्या जायच्या कारण या गाठी आयुष्यभर तुटत नसायच्या. इतकंच काय तर हाच जोडीदार पुढील सात जन्मी मिळो अशी प्रार्थना पतिपत्नी देवाकडे करायचे. हल्ली मात्र या लग्नाच्या गाठी सैल बांधल्या जातात की काय अशी शंका येऊ लागली आहे कारण आयष्यभर सोडाच पण काही वर्षे देखील विवाह झालेले दांपत्य एकत्र नांदायला तयार नाहीत. लग्नानंतर अवघ्या काही वर्षात पतीपत्नीमध्ये वाद होतो आणि हा वाद थेट घटस्फोटापर्यंत पोहचतो.

आज देशातील न्यायालयात घटस्फोटाचे लाखो याचिका प्रलंबित आहेत. दररोज त्यात भर पडतेच, घटस्फोटाची नवी याचिका दाखल झाली नाही असा एकही दिवस उगवत नाही. घटस्फोटाचे लाखो खटले प्रलंबित असल्याने सहा महिन्यांचा आत घटस्फोटाचा निकाल द्यावा असा निर्णय न्यायालयाने घेतला आहे. घटस्फोटाचे खटले तातडीने निकाली काढले जात असले तरी त्यात नव्याने भर पडत असल्याने न्यायालयही हतबल झाले आहे.

वास्तविक दोन दशकांपूर्वी घटस्फोटाचे प्रकरण नगण्य स्वरूपात होते. शेवटचा पर्याय म्हणून घटस्फोटाकडे पाहिले जात होते आज मात्र अगदी किरकोळ कारणांवरून देखील घटस्फोट मागितला जातो. आज न्यायालयात दाखल होणाऱ्या घटस्फोटाची कारणे पाहिले तर चक्रावून जाल. पत्नीला साडी नेसता येत नाही, पत्नीने केलेला स्वयंपाक बेचव असतो, पत्नी सतत टीव्ही आणि मोबाईलवर असते, पत्नी आपला मान राखत नाही यासारख्या हास्यास्पद आणि मनाला न पटणाऱ्या कारणांनी घटस्फोट मागितला जातो. पत्नीकडूनही घटस्फोटाची अशीच काहीबाही कारणे दिली जातात.

पती आपल्याला वेळ देत नाही. पती फक्त त्याच्या आई वडिलांचेच ऐकतो, पती आपल्याला बाहेर फिरायला नेत नाही, पती आपल्या मनासारखं वागत नाही अशी हास्यास्पद कारणे देऊन घटस्फोटाची मागणी केली जाते. घटस्फोटाची ही किरकोळ कारणे जितकी हास्यास्पद वाटतात तितकीच ती चिंताजनक देखील आहेत कारण अशा किरकोळ कारणांनी जर घटस्फोट होऊ लागला तर विवाह संस्थाच धोक्यात येईल. याशिवाय पती मारहाण करतो, अनैसर्गिक संबंधांची मागणी करतो, पत्नी उलट बोलते, पती म्हणून मान देत नाही अशा कारणांनी देखील घटस्फोटाची मागणी केली जाते अशी आणि यापेक्षाही अनेक वेगवेगळी कारणे घटस्फोटासाठी दिली जातात अर्थात सर्व कारणांचा अभ्यास करूनच न्यायालय घटस्फोटाचा निकाल देते.

अर्थात अशा किरकोळ कारणांसाठी घटस्फोटाची मागणी करणे कितपत योग्य आहे याचा विचार दोघांनीही करायला हवे. नाते कोणतेही असो त्यात राग रुसवा असतोच, संसार म्हटले की भांड्याला भांडे लागतेच, जर दोघात वाद झाला की दोघांपैकी एकाने शांत राहावे थोड्या वेळात राग शांत होतो आणि वादही मिटतो मात्र शब्दला शब्द दिला की वाद वाढतो आणि वादाचे रूपांतर मोठ्या भांडणात होते.

त्यात दोन्ही कडील नात्यात कोणीना कोणी तेल ओतणारा असतोच, असे तेल ओतणारे व्यक्ती आल्यास हा वाद थेट न्यायालयात पोहचतो. अगदी क्षुल्लक कारणही नाते तोडायला पुरेसे ठरत असल्याने नात्याची गुंफण घालताना थोडे सावरूनच वागावे लागते. माझे चुकलेच हे मनाने मान्य करावे लागते. तरच नाते टिकते आणि त्यातही गोडवा राहतो. नात्यात सर्वात महत्वाचा असतो तो विश्र्वास. जर विश्र्वासाला तडा गेला तर नात्यात वितुष्ट येतेच म्हणून पतिपत्नी मध्ये विश्र्वास खूप महत्वाचा आहे विश्र्वासाला तडा जाऊ न देण्याची जबाबदारी दोघांचीही आहे. नात्यात दुरावा होण्याचे आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे पतीपत्नीमध्ये असलेला अहंकार.

अहंकारामुळेच नाती तुटतात म्हणूनच दोघांनीही अहंकार दूर ठेवायला हवा. अहंकाराला दूर ठेवून परस्परावरील विश्र्वास कायम ठेवला तर नात्यात दुरावा निर्माण होणार नाही आणि घटस्फोटाचे प्रमाणही कमी होईल.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## युवा वर्गामध्ये हृदयविकारांचा वाढता आजार चिंताजनक!

पुर्वी हृदयविकाराचे आजार (हार्डअटॅक) याबाबत एक वयोमर्यादा होती साधारणतः वयाच्या ६० वर्षांनंतर या आजारांचे प्रमाण जास्त रहायचे.परंतु गेल्या काही वर्षांत ३० ते ५० वर्षे वयोगटामध्ये हृदयविकाराच्या आजारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. कारण गेल्या काही वर्षांमध्ये प्रत्येक व्यक्तींची रहानिमानाची,खानपानाची,मादक द्रव्ये व अन्य व्यसन यामुळे दिनचर्येच्या शैलीमध्ये मोठ्या प्रमाणात बदलाव आल्याचे दिसून येते.

पंजाब मधील फिरोजपुर मधील गुरूहर सहाय या मैदानावर दिनांक २९ जून २०२५ रविवारला हरजीत सिंह नामक युवा क्रिकेट खेळाडू बैटींग करतांना छक्का मारला व अचानक हार्ट अटैक आला व तो तिथेच पडला आणि त्याचा मृत्यू झाला ही धक्कादायक बाब आहे.यामुळे सर्वांचेच हृदय हळूहळून आले व खेळाडूंमध्ये शोककळा पसरली.यापुर्वीही मुंबईमध्ये जून २०२४ मध्ये क्रिकेट मैचच्या दरम्यान राम गणेश तेवर नामक खेळाडूने छक्का मारल्या बरोबर हृदयविकाराचा झटका आला व क्रिकेट खेळतांना अशीच हृदयद्रावक घटना घडली व या ४२ वर्षीय या खेळाडूचा मृत्यू झाला.

२०२४ मध्ये अशाप्रकारे पुणे येथील गरवारे स्टेडियममध्ये इमरान पटेल नामक खेळाडू ३५ वर्षीय क्रिकेट मैच खेळताना हृदयविकाराचा




झटका येऊन मृत्यू झाला.यावरून स्पष्ट होते की अटैकचे (हृदयविकाराच्या आजारांचे) प्रमाण दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे.हृदयविकाराच्या मृत्यूचे अनेक कारणे असू शकतात मादक द्रव्ये सेवन करणे, धुम्रपान, तंबाखू, गुटका,मद्य सेवन यांचाही हृदयविकारावर मोठ्या प्रमाणात गंभीर परिणाम होतो व पुढे चालून मृत्यूचे कारण बनत असते. त्याचप्रणाणे मोबाईलचा जास्त प्रमाणात वापर, वाढता तनाव,अनियमित जीवनशैली, दिनचर्येत फास्ट फूडचे वाढते प्रमाण,आहाराची ढासळती गुणवत्ता,वेळोवेळी आरोग्याची काळजी न घेणे व व्यायामाचे कमी प्रमाण,वाढते लठ्ठपणा,इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम युवावर्गामध्ये होत असल्याने हृदयविकाराच्या आजारांचाधोका वाढतो आहे.

युवावर्गामध्ये हृदयविकाराच्या आजारांमध्ये भर टाकली(बीपी व शुगर)डायबिटीजने हाई ब्लड शुगरचा सरळ प्रभाव हृदयविकाराच्या आजारांवर होतो.या आजारांचे मुख्य कारण म्हणजे मसालेदार पदार्थ,ऑयली फूड,फास्ट फूड,अती कोल्ड्रिंक्स घेणे आणि मिठाई यामुळे डायबिटीजचे प्रमाण वाढुन सरळ हृदयविकारांचे आजार होत आहे किंवा होवू शकतात.सोबतच सध्याच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे व वाढत्या प्रदूषणामुळे सुध्दा हृदयविकाराचे आजार दिसून येतात.आपण पाहिले की सध्याच्या परिस्थितीत अनेक अभिनेता,गायक, हास्य कलाकार आणि निर्दे शक याचा हृदयविकाराच्या आजारांनी मृत्यू झाल्याचे आपण पाहिले.यात वयोमर्यादा ३०,४०,५० वर्षे अशा प्रमाणे कमी वयोमर्यादा आहे.या वयात हृदयविकाराच्या आजारांने मृत्यू (हार्डअटॅक) होत असेल तर ही बाब अत्यंत चिंताजनक, गंभीर व धक्कादायक आहे.त्यामुळे वाढते हृदयविकारांचे आजार किंवा अन्य आजार पहाता सर्वांनीच आपल्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## ''चरथ भिक्खवे चारिके, बहुजन हिताय, बहुजन सुखाय, लोकानुकम्पाय, अत्थाय हिताय देवमनुस्साने ।

तथागतांनी धम्म प्रचार व प्रसारासाठी भिक्खूंना आदेश दिला. भिख्खूहो, बहुजनांच्या हितासाठी, सुखासाठी, लोकांवर अनुकंपा करण्यासाठी, मानवांना कल्याणकारी, धम्मपदेश करण्यात तुम्ही प्रवृत्त व्हा, प्रारंभी कल्याणपद, मध्यंतरी कल्याणपद आणि शेवटीही कल्याणपद अशा या धम्म मार्गाचा लोकांना उपदेश करा. वर्षावास म्हणजे पावसाळ्यातील निवास आषाढी पौर्णिमेपासून आश्विन पौर्णिमेपर्यंत, या तीन महिन्यात फक्त बुद्ध विहारात जीवन व्यतीत करणे. या काळात भिक्खूंनी धम्म-प्रचार-प्रसारासाठी स्वत:ला तयार करणे, बौध्द उपासकउपासिकांना धम्म चं महत्व सांगणे, ध्यान-साधना करणे, धम्म दान स्विकारणे आदि नित्यक्रम करावे असा आदेश तथागतांनी भिक्षूसंघास दिला. त्याप्रमाणे ते आचरण करीत असत. यालाच वर्षावास म्हणण्याची प्रथा सुरु झाली, ती आजतागायत अविरत सुरु आहे यात खंड नाही. इथेच वर्षावासाचं महत्व सर्वश्रुत आहे. तथागतांनी बुद्धत्व प्राप्तीनंतर पंचवर्गीय संन्याशांना आपला अष्टांगिक मार्ग, प्रतीत्य समुत्पाद, चार आर्यसत्य हे समजावून दिल्यानंतर त्यांना ते कळले. इसिपतन वन (आधुनिक सारनाथ), वाराणसी येथे अनुत्तर असे पहिले धम्मचक्र प्रवर्तन केले. आश्विन पौर्णिमेला एकसष्ठ अर्हत भिक्षुंच्या समवेत धम्मचक्राची घोषणा केली. चारही दिशांना जाऊन बहुजन हिताय - बहुजन सुखाय धम्माची अशी सिंहगर्जना केली.

तथागत बुध्दांची पहिली धम्मसभा आषाढी पौर्णिमेला झाली. पुढे भिख्खूसंघाच्या निर्मीतीनंतर दरवर्षी याच कालावधीत उपासक वर्षावास करतात. याची सुरुवात आषाढी पौर्णिमेला होते आणि याच काळात पंढरीची वारी ही सुरु होते, हे निव्वळ योगायोग नाही. भगवान बुद्धाच्या काळात बुद्धांनी सर्व भिक्षूंना धम्माचा प्रसार करण्याचे आदेश दिले आणि सर्व बौद्ध भिख्खू या कामात गुंतले होते, परंतु असे केल्याने त्यांना बऱ्याच संकटांना आणि विशेषत: पावसाळ्यात नद्यांमध्ये अनेक संकटांना सामोरे जावे लागे. पुरामुळे बौद्ध भिख्खू वाहून जात आणि त्यांच्या चालण्याने शेतातील पिकांचे नुकसान होत त्यांनी हे तथागतांना सांगितले, बुद्धांनी आदेश दिला की आषाढ पौर्णिमेपासून ते अश्विनी पौर्णिमेपर्यंत सर्व भिक्षूंनी एकाच ठिकाणी रहावे, भिक्षेसाठी गावात जाऊ नये. एकाच ठिकाणी राहून धम्माचे पठण अध्ययन करावे. जर गरज पडली तर भिक्षू आपल्या गुरुंकडून जास्तीत जास्त एका आठवड्याचा वेळ घेऊन विहारातून बाहेर जाऊ शकतात, भगवान बुद्ध काळापासून वर्षावास अस्तित्वात आहे. तथागतांनी ४५ वर्षावास श्रावस्ती, जेतवन, वैशाली, राजगृह इत्यादी ठिकाणी केले. अशा प्राचीन गुरु-शिष्य परंपरेचे पालन आजही भारतात आणि बौद्धराष्ट्र थायलंड, म्यानमार, श्रीलंका, कंबोडिया आणि बांगलादेश पालन करतात.

आषाढ पौर्णिमेला वर्षावास सुरु होतो आणि अश्विन पौर्णिमेला संपन्न होतो, बौध्द धम्मात वर्षावासाला अनन्य साधारण महत्व आहे, सर्व बौध्द उपासक उपासिकांनी या तीन महिन्याच्या कालावधीत स्व:ताच्या घरी रोज बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या ''बुध्द आणि त्यांचा धम्म'' या पुस्तकाचे किंवा अन्य बुद्ध धम्माशी संबंधित पुस्तकाचे रोज सामुहिक वाचन करून त्यावर मनन चिंतन करावे व त्याचे आपल्या जिवनात अनुकरण केले पाहिजे, नियमितपणे शेजारच्या बुध्दविहारात जावून धम्म श्रवण करावा व धम्ममार्गावर आरूढ व्हावे, धम्मदान द्यावे, उपोसथ व्रत घेऊन अष्टशिलाचे पालन करून सद्गुणाचा पाया मजबूत करावा, आपल्याप्रमाणे प्रत्येक कुटुंबास यानुसार आचरण करण्यास प्रोत्साहित केल्यास बौध्द उपासकांचा मोठा संघ तयार होईल व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिलेल्या प्रबुध्द भारताचे दिव्य स्वप्न साकार होण्यास हातभार लागेल.

बुद्धांनी शिकवले की उपोसथ दिवस म्हणजे ''अशुद्ध मनाची शुद्धता'' करण्याचा दिवस होय, उपोसथ किंवा उपोस्थ या शब्दाचा अर्थ उप+स्था म्हणजे एकत्र बसणे होय, भिक्षुसंघाची एकसंघपणा टिकवून राहण्यासाठी उपोसथ विधी खूप महत्त्वाचा मानला गेला. उपोसथ विधी बुद्ध काळापासून अस्तित्वात आहे आणि बौद्ध देशांमध्ये उपोसथ विधी श्रद्धापूर्वक पाळला जातो. अमावस्या आणि पौर्णिमेच्या दिवशी भिख्खू पटिमोक्खा (आचारसंहितेचे नियम) यांचे पाक्षिक कबुलीजबाब आणि पाठ होते. या दिवशी बौद्ध उपासक आणि भन्ते धम्म अध्ययन आणि ध्यानाची तीव्रता आणखीन वाढवतात. विनयासंबधी जर आचारात काही दोष आला असेल तर उपोसथ दिनी भन्ते सर्वासमोर कबुलीजबाब देत असत व संघ नियमानुसार त्यांना पुढील कारवाईस समोर जावे लागत. हा विधी खूप पवित्र मानला जाई, आजही त्याचे पालन केले जाते.

धम्माप्रती वचनबद्ध उपासक गृहस्थ पंचशील, दहा परिमिता, अष्टांगिक मार्गाचे पालन करतात धम्म आचरणात उत्साह जागृत होण्याकरिता समाधी मार्गाचे, ध्यानाचे अवलंबन करतात. जेव्हा शक्य असेल तेव्हा उपासक या दिवसाचा उपयोग स्थानिक विहारात जाण्याची संधी म्हणून करतात. या दिनी संघाला विशेष दान अर्पण केले जाते, धम्म प्रवचन ऐकले जाते आणि रात्री उशिरापर्यंत धम्म बांधवा सोबत ध्यान-धारणा केली जाते. जे उपासक विहारात जाऊ शकत नाहीत अशांना ही उपोसथ दिन संधी देतो कि, आपले ध्यान करण्याचे प्रयत्न वाढवावे कारण या पवित्र दिनी जगातील हजारो उपासक ध्यान धारणेचा अभ्यासात वुद्धी होण्याच्या दिशेने पाऊल टाकतात.

तथागत बुद्धांच्या आदेशानुसार भिक्खुसंघ धम्म प्रचारासाठी सर्व ऋतूत चारही दिशांना पायी फिरत असत, या तिन्ही ऋतुत त्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागत असे, नैसर्गिक संकटांचा सामना करून प्रतिकूल परिस्थितीतही ते धम्माचा प्रचार-प्रसार करीत असत. हे सर्व लक्षात घेऊन तथागत बुद्धांनी भिख्खू संघाला आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या कालावधीत, एकाच ठिकाणी विहारात राहून धम्माचा अधिक अभ्यास करीत आसपासच्या परिसरातील उपासकांना धम्मज्ञान देण्याबाबत सूचना दिल्या, आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा हा काळ वर्षावास म्हणुन तेव्हापासुन संपन्न होऊ लागला (वर्षावास म्हणजे पावसाळयातील निवास) वर्षावास काळात श्रध्दावान उपासक विहारात जावून धम्म-श्रवण करतात, विहारात भिख्खूंना श्रध्दाभावनेने भोजनदान करतात व आजही सातत्याने सुरु असतात. फार महत्व आहे या पोर्णिमेचेष्ठआपण आपली संस्कृती जपली पाहिजे. आषाढ पौर्णिमेच्या अर्थात गुरु पौर्णिमेच्या सर्व उपासकउपासिकांना मंगलमय शुभेच्छा!

प्रविण बागडे
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

## झरोका

एक - एक देश, एक निवडणूक या विधेयकावर चर्चा करताना दोन माजी सरन्यायाधिशानी आक्षेप घेतला असला तरी ते विधेयक पारीत करण्याचा केंद्र सरकारचा डाव दिसतो आहे, कांहीच कळत नाही, डोकं बधीर झालंय.

दुसरा - अरे, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे कोणाचे ही ऐकत नाहीत. विरोधकाशी चर्चा करीत नाहीत मग एक देश, एक निवडणूक या विषयीच्या नियूक्त समितीतील सदस्याचे ते कसे काय ऐकतील, ते वटहूकूमी अधिकारी, प्रधानमंत्री आहेत हे लक्ष्यात ठेव.

एक - अहो, एक देश, एक निवडणूक या प्रस्तावीत विधेयकात त्रुटी आहेत. संदिग्धात आहे, नियमावली स्पष्ट नाही असे स्पष्ट मत माजी सरन्यायाधिश खेहर, धनंजय चद्रचूड यानी मांडले ते सुधारावे असे स्पष्ट केले तरी ही लोकसभा, विधानसभा निवडणूका एकत्र घेण्यासाठी समिती आग्रही आहे, लोकशाहीत असा हट्ट काय कामाचा म्हणून बोलतो आहे.

दुसरा - अरे, भारत देश लोकशाहीवादी आहे. पंरतू भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे संसदेतील बहूमतवादी पंतप्रधान आहेत, त्यामूळे एक देश, एक निवडणूक हे विधेयक नियूक्त समितीतही पारीत होणारच तू शांत बस.

एक - अहो, विधानसभा, लोकसभा निवडणूका एकत्रीत झाल्या तर सावळा गोंधळ होईल, साम, दाम, दंड, भेदाची कडी होईल. राजकीय पक्षात तालमेळ राहाणार नाही. झूंडशाही गुंडशाही माजेल. लोकशाहीच संपूष्टात येईल ही भिती वाटते म्हणून बोलतोय.

दुसरा - अरे, जाता, जाता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी याना लोकशाही आणी भारतालाच गारद करुन पायउतार होतील असे जे लोक बोलतात तेच होणार आहे समजलं !

## काय बोलता राव ?

जनसुरक्षा विधेयकाला काल विधानसभेत महाविकास आघाडीने पाठींबा दिला आणी लगेच विधान परिषदेत आक्षेप घेतला यातील काय गौडबंगाल आहे तेच कळत नाही.

**काय बोलता राव !**

अरे, राज्यात केंद्रा प्रमाणेच डाव्या विचारसरणीच्या समाजवादी, धर्मनिरपेक्ष, पूरोगामी विचाराच्या काही सामाजीक संघटना कार्यरत आहेत. त्यात कांही कर्म, धर्मवादी संघटनाही कार्यरत आहेत, त्यातील कांही संघटनाचा डाव्या विचाराच्या संघटनात समावेश करुन नवीन जनसुरक्षा विधेयक अधिवेशन काळात मांडले गेले त्यास कॉग्रेस, ठाकरे, सेनेने पाठींबा दिला, पंरतू कांही सामाजीक नेते कार्यकर्ते व फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यानी टीका केली. त्यातच कॉग्रेसच्या खा. राहूल गांधी यानी ही कॉग्रेसच्या राज्यातील नेत्याकडे नाराजी व्यक्त केली आणी काल पाठींबा आज विरोध कसा प्रकार घडला असला तरी तो बहूमताने यशस्वी झाला आणी पून्हा डावे, उजवे एकत्र झाले असेच म्हणावे लागेल. मग यूती काय आणी महाविकास आघाडी काय एकाच नाण्याच्या दोन बाजूच म्हणावे लागेल. मग बोला दाजीबा !



### तांडा --

समोर ठेवे शिकारी
भुसा भरलेला मेंढा
विचार नसे कसला
धडका मारतो गेंडा

काय करेलं युध्दात
शिलेदार रे एकांडा
जमवून घ्यावे वेळी
ना राहे एकलकोंडा

एकमनगटी बांधला
का बहु पक्षीय गंडा
आपली तिजोरी भरे
इतरांना घालून गंडा

जमूघ्या परकीयांशी
स्वकियातुंबळभांडा
कितीचोरून वागालं
होऊ नये फोडभांडा

कोण येणार बरोबर
शोधत बेभान हिंडा
जमलेनाही अनुयाई
खुशाल बदला झेंडा

मोरक्या घेई निर्णय
पाठीमागून ये तांडा
निसटून जाता झेंडा
राहे हाती तसादांडा

### उच्छाद --

अश्र्लाघ्य घडे घटना
सर्वत्र उडतो उच्छाद
राईचापर्वत करतात
आगीतहोरफळे वाद

गांभीर्य खरे कुणाला
करत राही प्रति वाद
आरोपप्रतिआरोपात
हरवून गेलायं संवाद

भेटाया उसळे सगळे
मिडियास मिळे खाद
विसरत चालले दुःख
खपल्या काढूनि याद

राज कारणी मुरलेले
असे चाणाक्ष उस्ताद
सामनाकरे संकटाशी
रे नेहमीतयार इस्ताद

करु सखोल चौकशी
शांतवू पाहते विवाद
सर्वात सोपे काम ते
नेमून टाकला लवाद

काय झाले हो पुढे ते
कुणालाराहणारं याद
मस्त चाले राज्यकर्ते
आतातरी टळते ब्याद

**- हेमंत मुसरीफ पुणे .**
**९७३०३०६९९६...**

## चांगल्या कामासाठी कितीही गुन्हे दाखल होऊ दे; संजय गायकवाडांनी ठणकावून सांगितले

मुंबई : आमदार निवासातील कँटीनमध्ये मिळणाऱ्या अन्नाच्या दर्जाबाबत नाराजी व्यक्त करत शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी एका कँटीन कर्मचाऱ्याला मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार काही दिवसांपूर्वी समोर आला होता. या घटनेमुळे मोठा राजकीय व सामाजिक संताप व्यक्त करण्यात आला असूनही, अद्याप पोलिसांकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत आज प्रतिक्रिया देताना म्हटलं, ''या प्रकरणात पोलिसांनी निश्चितपणे चौकशी केली पाहिजे. अशा प्रकारच्या घटनांसाठी कोणतीही औपचारिक तक्रार आवश्यक नसते. जर गुन्हा दखलपात्र असेल, तर पोलीस स्वत:हून कारवाई करू शकतात.'' त्याचबरोबर विरोधकांनी वेगवेगळ्या ठिकाणी आमदार गायकवाड यांच्याविरोधात तक्रार देण्याचा प्रयत्न केला, त्यावर बोलताना संजय गायकवाड म्हणाले,

मी चांगलं काम केलं चांगल्या कामासाठी कितीही गुन्हे दाखल झाले तरी आय डोन्ट केअर. त्याचबरोबर आमदार संजय गायकवाड यांनी विरोधकांवर निशाणा साधला आहे.

# मनपा आयुक्तांकडून शहरातील वाहतूक व्यवस्थेची पाहणी

लातूर/ प्रतिनिधी: लातूर शहर मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी शहरातील प्रमुख चौकातील वाहतूक व्यवस्थेची पाहणी केली. चौकामध्ये होणारी वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी विविध उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.



आयुक्त श्रीमती मानसी यांनी गंजगोलाई,फ्रुट मार्केट, अण्णाभाऊ साठे चौक, बसवेश्र्वर चौक,कन्हेरी चौक, छत्रपती चौक, बाह्य वळण रस्ता,पाच नंबर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, नवीन रेणापूर नाका व जुना रेणापूर नाका या शहरातील प्रमुख चौकात स्वतः थांबून वाहतूक व्यवस्थेचा आढावा घेतला.

शहरात होणारी वाहतुकीची कोंडी दूर करण्यासाठी काही रस्ते वन-वे करण्याबाबत पाहणी करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. गंजगोलाई परिसरात वाहने पार्किंग करण्यासाठी जागेची आयुक्तांनी पाहणी केली. गंजगोलाईत ऑटो थांबे निश्र्चित करण्यासाठी जागा पाहिली. अण्णाभाऊ साठे चौक येथील पार्किंगची जागा तसेच बसवेश्र्वर चौकातील वाहतूक कोंडीचीही त्यांनी पाहणी केली.

शहरातील कन्हेरी चौक व वाडा हॉटेल येथे सिग्नल चालू करण्या संदर्भात आयुक्तांनी पाहणी केली. शहरा बाहेरून जाणारा बाह्य वळण रस्ता व सर्विस रोडवर होणाऱ्या अनाधिकृत पार्किंग बाबत ट्रान्सपोर्ट असोसिएशन, वाहन दुरुस्ती चालक व ऑटोमोबाईल चालकांची बैठक घेण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना केल्या. पाच नंबर चौकातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी काय करता येईल? याची आयुक्तांनी पाहणी केली.

नवीन रेणापूर नाका परिसरात रस्त्यावर पाणी थांबत असल्याने वाहतुकीची कोंडी होते. त्या पाण्याचा निचरा करण्याचा सूचना करतानाच रेल्वे स्थानकाकडे जाणारी डावी बाजू मोकळी करावी, असेही आयुक्तांनी सूचित केले. जुना रेणापूर नाका येथील बस स्थानकाकडे जाणाऱ्या मार्गाची पाहणी करून तेथील वाहतूक कोंडी दूर कशी करता येईल? या संदर्भात चर्चा केली. छत्रपती शिवाजी महाराज चौकात प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर तेथे काय उपाययोजना करता येतील ? यासंदर्भात आयुक्तांनी माहिती घेतली.

शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी पार्किंगच्या जागा कराव्यात. रस्त्यावर पट्टे मारावेत. पार्किंगच्या जागेसंदर्भात फलक लावावेत तसेच अडथळा ठरणारे विजेचे खांब हलवावेत, अशा सूचनाही आयुक्तांनी अधिकाऱ्यांना केल्या.यावेळी वाहतूक नियंत्रण शाखा व मनपा अतिक्रमण विभागाचे अधिकारी सोबत होते.

# निर्माता - दिग्दर्शक विशाल गिरी यांना नॅशनल आयकॉन अवॉर्ड पुरस्कार प्रदान

लातूर : ग्रामीण भागातून स्वतःच्या कष्टाने पुढे आलेले निर्माता - दिग्दर्शक विशाल गिरी हे मागच्या १२ -१३ वर्षांपासून हिंदी आणि मराठी चित्रपट क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांना गुरुवार, दि. १० जुलै २०२५ रोजी प्रधानमंत्री संग्रहालय, तीन मूर्ती मार्ग, नवी दिल्ली या ठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीत नॅशनल आयकॉन अवॉर्ड २०२५ देऊन सम्मानित करण्यात आले .




या अवॉर्डचे वितरण प्रसंगी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, केंद्रीय ग्रामीण विकास आणि पोलाद राज्यमंत्री फगण सिंग, उत्तर प्रदेशाचे कामगार आणि रोजगार मंत्री रघुराज सिंग , उत्तर प्रदेशाहचे माजी मूलभूत शिक्षण मंत्री सतीश चंद द्विवेदी, भाजपचे रिसर्च अँड पॉलिसी विभागाचे राष्ट्रीय सह प्रभारी विनय चौधरी, अभिनेता विजय वर्मा यांच्यासह अनेक मान्यवरांची यावेळी विशेष उपस्थिती होती.

भारतीय युवा वेल्फेअर असोसिएशन आणि पर्यटन विभाग , जम्मू - काश्मीर सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने विशाल गिरी यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या उपक्रमाचे संरक्षण मंत्रालयाकडूनही कौतुक करण्यात येत आहे.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्रिमंडळात समावेश करण्यात आलेले महाराष्ट्रातील मंत्रीगण, संरक्षण मंत्रालयातील पदाधिकारी यांसह अनेक दिग्गजांची उपस्थिती राहिली. ग्रामीण भागातून पुढे आलेले निर्माता दिग्दर्शक विशाल गिरी यांना आतापर्यंत अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. २०२४ मध्ये त्यांना मध्ये दादासाहेब फाळके अवॉर्ड्स सुद्धा मिळाला आहे,. या पुरस्काराबद्दल गिरी यांनी पर्यटन विभाग मंत्रालय आणि संरक्षण मंत्रालयाने आपल्या कामाची दाखल घेतल्याबद्दल आभार व्यक्त केले आहेत. विशाल गिरी यांचा नाद हा नविन मराठी चित्रपट डिसेंबर महिन्यात सर्वत्र महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचे निर्माते- दिग्दर्शक स्वतः विशाल गिरी आहेत. नॅशनल आयकॉन अवॉर्ड मिळाल्या बद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी विशाल गिरी यांचे अभिनंदन केले आहे.

# मातुळ ग्रामपंचायत अंतर्गत रमाई आवास योजनेत मोठा भ्रष्टचार

भोकर (प्रतिनिधी) तालुक्यातील मातुळ ग्रामपंचायत अंतर्गत रमाई आवास योजनेमध्ये मोठा भ्रष्टाचार झाला असून मातुळ येथील ग्रामस्थ रामा विठ्ठल फुले यांनी १० ते १५ वर्षापूर्वी बांधलेल्या जुन्या घरावर बिल उचलून घेतले व उचलून दिले यासंबंधी सखोल चौकशी करून त्या अपहारास जबाबदार असलेले विद्यमान सरपंच ग्रामसेवक इंजिनीयर यासह घरमालक यांच्यावर शासनाची आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीचे भोकर तालुकाध्यक्ष दिलीप के. राव यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. दिनांक १५ जुलै २०२५ पर्यंत चौकशी करून संबंधित दोषीनविरुद्ध गुन्हा दाखल न झाल्यास १६ जुलै २०२५ रोजी अमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनात दिला आहे.




भोकर तालुक्यातील मौजे मातुळ ग्रामपंचायत अंतर्गत विद्यमान सरपंच,ग्रामसेवक, इंजिनियर यांनी संगनमत करून शासनाच्या नियमांना वेशीवर टांगत, आपल्या पदाचा गैरवापर करून रमाई आवास योजनेचा लाभ मिळवून देण्याकरिता रामा विठ्ठल फुले यांचे नाव २०२३ च्या ठराव क्रमांक ४ मध्ये घेऊन १० ते १५ वर्षांपूर्वी बांधलेल्या जून्या घराला नविन घर दाखवुन , दुसऱ्याच्या घराचे फोटो ऑनलाईन अपलोड करून घर न बांधताच २०२५ मध्ये बिल उचलून दिले व रमाई आवास योजनेत आर्थिक गैरव्यवहार करून शासनाची मोठी फसवणूक केली. या गैरप्रकारची, अपहाराची सखोल चौकशी करून विद्यमान सरपंच,ग्रामसेवक, इंजिनिअर यांच्यावर निलंबनाची कारवाई करून घरमालकासह सर्व दोषींवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा या मागणीच्या अनुषंगाने वंचित बहुजन आघाडीचे भोकर तालुका अध्यक्ष दिलीप के राव यांनी अनेक वेळा तक्रारी निवेदन देवूनही याप्रकरणी अद्याप कसलीही चौकशी होत नाही. संबंधित दोषींना भोकर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडून अभय मिळत असल्याने सदरील भ्रष्टाचाराची चौकशी होत नाही आणि या भ्रष्टाचारावर पांघरूण घालण्याचा प्रकार दिसून येत आहे. या भ्रष्टाचार प्रकरणी प्रशासनाकडून दिरंगाई होत असल्याने प्रशासनाला जागे करण्यासाठी दिनांक ३० जून रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांना पुनश्र्च एकदा निवेदन देऊन संबंधित भ्रष्टाचारा प्रकरणी रमाई आवास योजनेत बिल उचलून घेणारे रामा विठ्ठल फुले यांच्या घराची उच्च स्तरीय सखोल चौकशी करून १५ जुलै २०२५ रोजी पर्यंत संबंधित घर मालकासह सर्व दोषींवर शासनाची आर्थिक फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल न केल्यास १६ जुलै २०२५ पासून लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करणार असल्याचा इशारा वंचित बहुजन आघाडीचे भोकर तालुका अध्यक्ष दिलीप के राव यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

# उदगीर येथील पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात १०३ उमेदवाराची प्राथमिक निवड

लातूर, (जिमाका) : जिल्ह्यातील युवकांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी लातूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, लातूर मॉडेल करिअर सेंटर आणि उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात १०३ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली, तर ६५ उमेदवारांची अंतिम निवड पूर्ण झाली.



या रोजगार मेळाव्यात हैदराबाद, छत्रपती संभाजीनगर, पुणे आणि लातूर जिल्ह्यातील नामांकित कंपन्यांचे उद्योजक उपस्थित होते. त्यांनी प्रत्यक्ष मुलाखतींद्वारे उमेदवारांची निवड केली. मेळाव्याच्या प्रारंभी कौशल्य विकास सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे उद्दिष्ट स्पष्ट केले. युवकांनी रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या माध्यमातून स्वतःच्या जीवनाला योग्य दिशा द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. आर. के. मस्के, प्रा. डॉ. जी. जी. जेवळीकर, प्रा. डॉ. साबदे आणि लातूर मॉडेल करिअर सेंटरचे यंग प्रोफेशनल दत्तात्रय कांबळे यांनी कौशल्याच्या महत्त्वाविषयी मार्गदर्शन केले.या मेळाव्यात १२ आस्थापनांनी ३३५ पदे अधिसूचित केली होती. या पदांसाठी उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. तसेच, शासनाच्या विविध रोजगार आणि स्वयंरोजगार योजनांची माहिती उमेदवारांना देण्यात आली. रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षणाची संधी एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यात आली. यामध्ये १०३ उमेदवारांची मुलाखतींद्वारे प्राथमिक निवड झाली, तर ६५ उमेदवारांची अंतिम निवड पूर्ण झाली, अशी माहिती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी दिली.

## इतिहासात आजचा दिवस १२ जून २०२५

अंतरराष्ट्रीय
११९१ - तिसरी क्रुसेड - दोन वर्षांच्या वेढ्यानंतर एकरचा किल्ला पडला.
१५८० - ऑस्ट्रोग बायबलचे प्रकाशन.
१६९१ - ऑघ्रिमची लढाई - इंग्लंडच्या विल्यम दुसऱ्याने स्कॉटलंडच्या जेम्स सातव्याला हरवले.
१८१२ - १८१२चे युद्ध - अमेरिकेने कॅनडावर आक्रमण केले.
१८९२ - मॉंट ब्लांक पर्वतावरील सरोवर फुटले. खालील सेंट जर्व्हे गावात पूर. २०० ठार.
१९३२ - हेडली व्हेरिटीने एकाच डावात १० धावा देउन १० बळी घेतले व क्रिकेटमधील उच्चांक स्थापित केला.
१९३३ - अमेरिकन कॉँग्रेसने कामगारांसाठी न्यूनतम म ेबदला ताशी ३३ सेंट ठरवला.
१९४३ - दुसरे महायुद्ध - प्रोखोरोव्हकाची लढाई.
१९५० - रेने प्लेव्हेन फ्रांसच्या पंतप्रधानपदी.
१९६७ - नुवार्क, न्यु जर्सी शहरात वांशिक दंगली. २७ ठार.
१९७५ - साओ टोमे व प्रिन्सिपला पोर्तुगालपासून स्वातंत्र्य.
१९७९ - किरिबाटीला युनायटेड किंग्डमपासून स्वातंत्र्य.
१९९३ - जपानच्या होक्काइडो द्वीपावर रिश्टर म ापनपद्धतीनुसार ७.८ तीव्रतेचा भूकंप. यामुळे तयार झालेल्या सुनामीने ओकुशिरी द्वीपावर २०२ बळी घेतले.
२००४ - पेद्रो संताना लोपेस पोर्तुगालच्या पंतप्रधानपदी.
२००५ - आल्बर्ट दुसरा मोनॅकोच्या राजेपदी.
२००८ - बीसीसीआयच्या सुपरहिट आयपीएलची प्रेरणा घेत इंग्लंड व वेल्स क्रिकेट बोर्ड (ईसीबी) ने ९ संघांसह वर्ष २०१० मध्ये इंग्लिश ट्वेंटी-२० प्रीमियर लीग (ईपीएल) सुरु करण्याची योजना बनवली.

राष्ट्रीय
१२९५ - संत सावता माळी यांनी समाधी घेतली.
१९४९ - राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर घालण्यात आलेली बंदी उठविली.
१९६१ - पानशेत धरण फुटले. त्यामुळे खडकवासला धरणास खिंडार पडल्यामुळे पुण्यात हाहाकार.
१९८२ - शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी 'नाबार्ड'ची स्थापना.
२००६ - प्रसिद्ध संगीतकार आनंदजी भाई शहा यांना अमेरिकेतील बीएमआयच्या विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
२००७ - नवी मुंबईतील रिलायन्स इंडस्ट्रीच्या विशेष आर्थिक प्रकल्पासह अन्य २७ प्रकल्पांलर संसदीय समितीने मंजुरी दिली.
२००७ - हार्पर्स एंड क्वीन या नियतकालिकेत जगातील दहा सर्वांत सुंदर महिलांच्या यादीत ऐश्वर्याला नववे स्थान मिळाले.

जन्म
इ. स. पू. १०० - जगाच्या इतिहासातील श्रेष्ठ रोमन योद्धा ज्युलियस सीझर याचा जन्म.
१३९४ - अशिकागा योशिनोरी, जपानी शोगन.
१५९६ - मायकेल पहिला, रशियाचा झार.
१८५२ - हिपोलितो य्रिगोयेन, आर्जेन्टीनाचा राष्ट्राध्यक्ष.
१८५४ - जॉर्ज ईस्टमन, अमेरिकन संशोधक.
१८७० - लुई दुसरा, मोनॅकोचा राजा.
१९३७ - लायोनेल जॉस्पिन, फ्रांसचा पंतप्रधान.
१९४३ - ब्रुस टेलर, न्यूझीलँडचा क्रिकेटपटू.
१९४७ - पूचिया कृष्णमुर्ती, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९६५ - संजय मांजरेकर, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९६९ - ऍलन मुल्लाली, इंग्लिश क्रिकेटपटू.

निधन
१४४१ - अशिकागा योशिनोरी, जपानी शोगन.
१७१२ - रिचर्ड क्रॉमवेल, ईंग्लिश राज्यकर्ता.
१७७७ - नारायणराव पेशवे यांच्या पत्नी गंगाबाई हिचे पुरंदर किल्ल्यावर निधन.
१९४९ - डग्लस हाइड, आयर्लंडचा पहिला राष्ट्राध्यक्ष.
१९९९ - राजेंद्रकुमार, एकेकाळच्या सिल्व्हर ज्युबिली अभिनेता.

प्रतिवार्षीक पालन
स्वातंत्र्य दिन - किरिबाटी, साओ टोमे व प्रिन्सिप.

## चाकूर बाजार समिती सभापती निळकंठ मिरकले पाटील भाजपात

चाकूर/ प्रतिनिधी: चाकूर बाजार समितीचे सभापती निळकंठ मिरकले पाटील यांनी मुंबई येथे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश घेतला. मिरकले पाटील यांच्या समवेत सुमारे दीडशे ते दोनशे कार्यकर्त्यांनीही राष्ट्रवादी शरद पवार गटास सोडचिठ्ठी देत भाजपचा झेंडा हाती घेतला.



मुंबई येथे झालेल्या पक्षप्रवेश सोहळ्यास खा. अजित गोपछडे, माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, आ. अभिमन्यू पवार, संजय कौडगे, जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील मुरूमकर, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, रामचंद्र तिरुके, अहमदपूरचे अमित रेड्डी, चाकू चे माजी नगराध्यक्ष कपिल माकणे, तालुकाध्यक्ष रणजीत मिरकले पाटील, सिद्धेश्र्वर पवार, प्रताप पाटील,सज्ञनकुमार लोणाळे, युवराज पाटील, उपसभापती लक्ष्मण दंडीमे, दत्ता कलाले, बाजार समिती संचालक अजय काळे, दयानंद पाटील, राम जाधव, सौदागर शेडुळे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे चाकूर शहराध्यक्ष अमोल शेटे यांच्यासह अनेक गावचे सरपंच व सोसायटी चेअरमन यांची उपस्थिती होती.

अहमदपूर व चाकूर तालुक्यातील जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी आपण भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. दोन्ही तालुक्यांच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी आपण सतत प्रयत्नशील राहू, असे मत निळकंठ मिरकले पाटील यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केल्यानंतर व्यक्त केले.

## दुबईचा गोल्डन व्हिसा तब्बल ४ कोटींचा व्हिसा अवघ्या २३.३० लाखावर

मुंबई : संयुक्त अरब अमिरातीच्या सरकारने गोल्डन व्हिसाचे नियम शिथिल केल्याची चर्चा आहे. याअंतर्गत, गोल्डन व्हिसा मिळविण्यासाठी आता दुबईमध्ये मालमत्ता किंवा व्यवसायात गुंतवणूक करण्याची आवश्यकता राहणार नाही. गोल्ड व्हिसा हा दीर्घकालीन निवासासाठीचा परवाना आहे, ज्याद्वारे इतर देशांतील लोकांना दुबईमध्ये राहण्याची, काम करण्याची आणि अभ्यास करण्याची सुविधा दिली जाते.

